e-Token

(1)

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय,लेखा व कोषागारे**
**नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, संगणक कक्ष, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ३२.**

दूरध्वनी क्रमांक:- 022-22029128 email id: jd.it@mahakosh.in

क्र.संलेको/संगणक/ ट्रेझरीनेट/२०२२/२९६ दिनांक: १०/११/२०२२

10 NOV 2022

**-: परिपत्रक :-**

**विषय :- कोषागारात सादर झालेल्या देयकांसाठी पोहोच म्हणून कागदी टोकन ऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे टोकन (e-Token) वापरणे बाबत.**

**वाचा :- १) शासन वित्त विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र. क्र. १०४/२०२२/कोषा प्रशा ५, दिनांक २९.०९.२०२२**
**२) संचालनालयाचा प्रस्ताव क्र. संलेको/ संगणक/ ट्रेझरीनेट/ २०२२/ २४५, दि. १५.०९.२०२२**

**प्रस्तावना :-** अधिदान व लेखा कार्यालय, सर्व जिल्हा कोषागारे आणि उपकोषागारांमध्ये सादर होणाऱ्या देयकांची पोहोच देण्यासाठी पूर्वी पितळी टोकन जारी करण्यात येत असत. आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून सादर होणाऱ्या देयकांवर आणि पारगमन नोंदवहीतील संबंधित देयकाच्या नोंदीसमोर या पितळी टोकन क्रमांकाचा उल्लेख देयक स्वीकारणाऱ्या कोषागाराच्या लिपिकाकडून नमूद केला जात असे. सदर देयक कोषागाराकडून पारित झाल्यास त्याचा धनादेश वितरित करण्यापूर्वी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून सदर देयकाचे पितळी टोकन प्राप्त करून घेतल्यानंतरच धनादेश वितरित केला जात असे. जर सादर झालेले देयक आक्षेपित झाले असेल तर त्याच्याशी संबंधित पितळी टोकन संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून प्राप्त करून घेतल्यानंतर आक्षेपित देयक संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांस परत केले जात असे.

कोषागारांच्या संगणकीकरणाच्या पुढील टप्प्यात, सध्यस्थितीत पितळी टोकन वापरणे बंद केल्यानंतर त्या ऐवजी TreasuryNet प्रणालीतून तयार होत असलेला देयक क्रमांक (Bill Number) हा देयक स्वीकृती वेळी देयकावर आणि आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या पारगमन नोंदवहीवर नोंदविला ज़ात आहे. TreasuryNet प्रणालीतून या देयक क्रमांकानुसार कागदी टोकन (Paper Token) तयार केले जाते. या कागदी टोकन मध्ये देयक क्रमांक (Bill Number), देयक स्वीकृती दिनांक (Scroll Date), आहरण व संवितरण अधिकारी पदनाम, देयकाची निव्वळ व स्थूल रक्कम, योजना सांकेतांक (Scheme Code), तपशीलवार शीर्ष (Object of Expenditure) इत्यादी माहितीचा समावेश असतो. या कागदी टोकनद्वारे देयक आहरण व संवितरण अधिकारी यांचे कडून प्राप्त झाले, अशा आशयाची पोहोच कोषागाराकडून संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना दिली जात आहे.

असे देयक पारित झाल्यानंतर या देयकाचा धनादेश/ इलेक्ट्रॉनिक प्रदान आदेश संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देण्यापूर्वी या कागदी टोकन पत्रावर संबंधित आहरण व संवितरण अधिकारी आणि त्यांचा संदेशवाहक यांची स्वाक्षरी घेऊन सदर मूळ कागदी टोकन कोषागाराला परत मिळाल्यानंतरच असा धनादेश/ इलेक्ट्रॉनिक प्रदान आदेश संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना दिला जातो. या प्रक्रियेमध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून मूळ स्वरूपातील देयक कोषागाराकडे सादर झाल्याबाबतची पोहोच कोषागाराकडून आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडे देण्याची बाब समाविष्ट

CamScanner

आहे. तसेच पारित देयकाचा धनादेश/ इलेक्ट्रॉनिक प्रदान आदेश संबंधित अधिकाऱ्याला मिळाल्याची पोहोच आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून कोषागाराकडे देण्याची बाब समाविष्ट आहे.

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या या कागदी टोकन विषयक कार्यपद्धतीमध्ये बदल करून सदर कागदी टोकन ऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे टोकन (e-Token ) देण्याची कार्यपद्धती अंमलात आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS प्रणालीतील लॉगिनद्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे टोकन (e-Token ) उपलब्ध करून दिल्यास अशा प्रकारे कागदी स्वरूपाचे टोकन देण्याची गरज उरणार नाही. तद्नुसार कोषागारात सादर झालेल्या देयकांसाठी पोहोच म्हणून कागदी टोकन ऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे टोकन (e-Token) वापरणे करिता शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

अधिदान व लेखा कार्यालय, सर्व जिल्हा कोषागारे तसेच उपकोषागार कार्यालयांमध्ये सादर होणाऱ्या देयकांसाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना पोहोच म्हणून कागदी टोकन ऐवजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीचे टोकन (e-Token) वापरणे या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अधिदान व लेखा कार्यालय, सर्व जिल्हा कोषागारे आणि उपकोषागारांमध्ये सादर होणाऱ्या देयकांची पोहोच देण्यासाठी सद्यस्थितीत कोषागाराकडून देण्यात येत असलेले कागदी टोकन छापण्याची (Print काढण्याची) पध्दत दि.१५ नोव्हेंबर २०२२ पासून बंद करण्यात येत आहे.

२. दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ पासून आहरण व संवितरण अधिकारी यांनी अधिदान व लेखा कार्यालय, सर्व जिल्हा कोषागारे आणि उपकोषागारांमध्ये सादर केलेल्या देयकांसाठी देयक स्वीकारल्यानंतर, TreasuryNet प्रणाली मधून तयार होणाऱ्या इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) ची pdf प्रकारची File संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS प्रणालीमधील लॉगिनमध्ये तात्काळ उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**३. आहरण व संवितरण अधिकारी यांनी e-Token प्राप्त करून घेण्यासाठीची कार्यपध्दती पुढील प्रमाणे राहील :-**

३.१. आहरण व संवितरण अधिकारी यांना त्यांच्या DDO Login/Final Login in BEAMS मध्ये ---->Maintenance---->e-Token/e-Advice या Menu मध्ये e-Token आणि e-Advice चा तपशील मिळविण्यासाठी बटण उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

३.२. या पैकी e-Token या बटण वर क्लिक केल्यावर खालील प्रमाणे

१.Fin. Year, २. Bill From Date and ३.Bill To Date ही माहिती भरणे आवश्यक आहे.

ही माहिती भरल्यानंतर List Bills या टॅब वर क्लिक केल्यानंतर नमूद केलेल्या कालावधीतील सर्व देयकांच्या संदर्भातील e-Token तपशील खालीलप्रमाणे तक्त्यामध्ये उपलब्ध होईल.

१. Bill Number, २. Scheme Code, ३. Detail Head, ४. Bill Date, ५ Amount, ६. Status

३.३ या पैकी Bill Number वर क्लिक केल्यानंतर त्या देयकाचे e-Token दिसू लागते. सदर e-Token आहरण व संवितरण अधिकारी यांनी स्वीकारण्यासाठी 'Accept' असा टॅब देण्यात आलेला आहे, त्यावर क्लिक केल्यास 'Token Accepted Successfully' अशा आशयाचा संदेश दिसू लागेल. सदर संदेशाच्या 'Ok' बटनावर क्लिक केल्यानंतर सदर टोकन स्वीकृत झाल्याचे (Accepted) Status दिसू लागेल.

CamScanner

४) संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अशा प्रकारचे इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) प्राप्त झाल्याबाबत 'Accept' नावाच्या टॅब वर सदर देयक कोषागाराने स्वीकारल्याच्या दिनांकापासून सुट्टीचे दिवस वगळता ३ दिवसांच्या आत (Within ३ Days Excluding Holidays From Date of Scroll) क्लिक करणे आवश्यक असेल. या प्रकारे ३ दिवसात असे इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) 'Accept' न केल्यास त्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांची पुढील देयके कोषागारामध्ये TreasuryNet प्रणालीद्वारे स्वीकारली जाणार नाहीत.

५) संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना अशा प्रकारे प्राप्त झालेल्या इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) ची pdf प्रकारची File त्यांच्या संगणकामध्ये पुढील उपयोगाकरिता जतन करता येईल.

६) कोषागाराकडून पारित करण्यात आलेल्या देयकांसंदर्भात आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना देण्यात येत असलेल्या कागदी Advice Slip ऐवजी आता इलेक्ट्रॉनिक स्वरुपाची Advice Slip ही pdf स्वरूपात संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS प्रणालीमधील लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात येत असल्यामुळे यापुढे पारित झालेल्या देयकांसाठी इलेक्ट्रॉनिक स्वरूपाचे टोकन(e-Token) कोषागाराकडे परत करण्याची आवश्यकता राहणार नाही.

(७) **आक्षेपित देयकांबाबत च्या टोकन बाबत कार्यपध्दती :-**

७.१ एखादे देयक काही कारणाने कोषागाराकडून आक्षेपित करण्यात आल्यास त्या बाबतची सूचना संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS लॉगिन मधून e-Token/e-Advice या सुविधेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

७.२ अशा आक्षेपित झालेल्या देयकाच्या बाबत संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS लॉगिनमध्ये यापूर्वी उपलब्ध करून देण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) ची कागदी स्वरूपात प्रिंट घेण्यासाठी 'Print e-Token for Objected Bill' असा टॅब ॲक्टिव्ह स्वरूपात उपलब्ध होईल.

७.३ संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी 'Print e-Token for Objected Bill' या टॅबवर क्लिक करून छापण्यात आलेल्या (Print काढलेल्या) कागदी टोकनवर TreasuryNet प्रणालीमधून तयार झालेला 'Objection Delivery Reference Number' नमूद करण्यात आलेला असेल.

७.४ त्यावर (अशा e-Token for Objected Bill च्या छापील प्रतीवर) स्वाक्षरी करून ते कागदी टोकन सदर मूळ आक्षेपित देयक कोषागारातून प्राप्त करून घेण्यासाठी कोषागाराच्या देयक स्वीकृती व देव-घेव विभागाकडे (Delivery Section) सादर करावे.

७.५ केवळ आक्षेपित देयक कोषागारातून परत घेण्यासाठीच संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांना pdf स्वरूपातील इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) ची कागदी प्रिंट घेण्याची आवश्यकता असेल.

७.६ अन्य परिस्थितीत इलेक्ट्रॉनिक टोकन (e-Token) केवळ Save करूनही आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या अभिलेख्यामध्ये जतन करणे शक्य होईल.

७.७ असे आक्षेपित देयक TreasuryNet प्रणालीमधून Deliver करताना, कोषागाराच्या देयक स्वीकृती व देव-घेव विभागाकडे (Delivery Section) प्राप्त झालेल्या कागदी स्वरूपातील 'e-Token for Objected Bill' वरील 'Objection Delivery Reference Number' हा TreasuryNet प्रणालीमधील Delivery प्रक्रियेमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

CamScanner

(५)

८. **धनादेशाद्वारे प्रदान होत असलेल्या देयकांसंदर्भातील टोकन बाबत कार्यपध्दती :-**

८.१ पारित झालेल्या देयकांपैकी ज्या देयकांचे प्रदान धनादेशाद्वारे (Cheque Payment Mode) करणे आवश्यक असेल, अशा देयकांच्या बाबत 'Print e-Token for Cheque' असा टॅब संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या BEAMS लॉगिन मधे उपलब्ध करून देण्यात येईल.

८.२ आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी या टॅब वर क्लिक करून छापण्यात आलेल्या (Print काढलेल्या) कागदी टोकन वर TreasuryNet प्रणालीमधून तयार झालेला 'Cheque Delivery Reference Number' नमूद केलेला असेल.

८.३ त्यावर (अशा e-Token For Cheque च्या छापील प्रतीवर ) स्वाक्षरी करून ते कागदी टोकन सदर धनादेश कोषागारातून प्राप्त करून घेण्यासाठी कोषागाराच्या देयक स्वीकृती व देव-घेव विभागाकडे (Delivery Section) सादर करावे.

८.४ असे धनादेश TreasuryNet प्रणालीमधून Deliver करताना, कोषागाराच्या देयक स्वीकृती व देव-घेव विभागाकडे (Delivery Section) प्राप्त झालेल्या अशा कागदी स्वरूपातील e-Token for Cheque वरील 'Cheque Delivery Reference Number' हा TreasuryNet प्रणालीमधील Delivery प्रक्रियेमध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

९. तद्नुसार अधिदान व लेखा कार्यालय, सर्व जिल्हा कोषागारे, सर्व उपकोषागार कार्यालये व तांत्रिक टिम यांनी सदर कार्यपध्दतीची अंमलबजावणची दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ पासून १०० टक्के होईल हे पहावे.

करीता आवश्यक कार्यवाही तथा अंमलबजावणी प्रयोजनार्थ निर्गमित.

(वैभव राजेघाटगे)
संचालक
लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत:
१) अधिदान व लेखा अधिकारी कार्यालय, मुंबई
२) जिल्हा कोषागार कार्यालये (सर्व)
३) उपकोषागार कार्यालये (सर्व)
४) ट्रेझरीनेट शाखा/कोषागार शाखा, संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई

**प्रत माहितीस्तव:-**
१) उपसचिव, कोषा प्रशा-५, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) विभागीय सह संचालक, लेखा व कोषागारे (सर्व)
३) राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे.

CamScanner